*Annexure XIIB (3), (Vide Article - 12.05)*

महाराष्ट्र अनुसूचित जमातींच्या
भोगवटादारांच्या झाडांची विक्री
करणे [नियमन] अधिनियम, १९६९ अन्वये
अनुसूचित जमातींच्या भोगवटादाराच्या
झाडांची विक्री करुन प्राप्त झालेली रक्कम
जमा करणे/ आदा करणे बाबत.

महाराष्ट्र शासन,
महसूल व वन विभाग,
परिपत्रक क्रमांक एफएलडी/३६९१/प्र.क्र.४३२/फ- ३
मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२,
दिनांक : १८ मार्च १९९२.

पहा : शासन निर्णय महसूल व वन विभाग, क्रमांक टीआरएस/१०८३/२८०३/ फ – ३, दिनांक १३/९/१९८४.

परिपत्रक :-

असे आढळून आले आहे की, महाराष्ट्र अनुसूचित जमातींच्या भोगवटादारांच्या झाडांची विक्री करणे ( नियमन] अधिनियम, १९६९ मधील तरतुदीनुसार अनुसूचित जमातींच्या खातेदारांस अदा करावयाची लिलावात प्राप्त झालेली रक्कम बरेचदा चुकीच्या जमा लेखा शीर्षाखाली जमा करण्यात येते व त्यामुळे अशी जमा केलेली रक्कम परत करण्यासाठी तांत्रिक अडचणी निर्माण होतात. परिणामी, अनुसूचित जमातींच्या खातेदारांस रक्कम अदा करण्यास विलंब होतो. अनुसूचित जमातींच्या भोगवटादारांच्या झाडांच्या विक्रीपासून जमा होणारी रक्कम जमा करणे आणि खर्च वजा जाता उर्वरित रक्कम त्यांना अदा करण्यासाठी स्वतंत्र लेखाशीर्ष निर्माण करण्यात आलेली आहेत. त्याप्रमाणे अनुसूचित जमातींच्या खातेदारांच्या झाडांच्या विक्रीपासून जमा होणारी रक्कम खालील लेखा शीर्षात जमा करण्यात यावी :=

जमेचे शीर्ष :=

०४०६, वनीकरण व वन्यजीवन

०१, वनीकरण

८००, इतर जमा रक्कमा –

[पन्ना] अनुसूचित जमातींच्या वहिवाटदारांच्या झाडांची विक्री [विनियमन] अधिनियम १९६९ नुसार झाडांच्या विक्रीचे उत्पन्न.

अनुसूचित जमातींच्या खातेदारांना अदा करावयाची रक्कम खाली नमूद करण्यात आलेल्या लेखा शीर्षामध्ये मंजूर केलेल्या तरतुदींतून करण्यात यावी.

खर्चाचे लेखाशीर्ष :-

२४०६, वनीकरण व वन्यजीवन,

०१, वनीकरण

८००, इतर खर्च

[आठ] महाराष्ट्र अनुसूचित जमातीच्या भोगवटादारांच्या झाडांची विक्री करणे [नियमन] अधिनियम, १९६९ अन्वये आदिवासी खातेदारांना प्रदान

[ २४०६ ०६८ ६ ]

अनुसूचित जमातींच्या भोगवटादारांच्या झाडांची विक्री केल्यानंतर, शासन जमा झालेली रक्कम त्यांना परत करण्यासाठी, शासनाच्या मंजूरीसाठी प्रकरणे पाठवितांना, कोषागार/उपकोषागारे येथे चलनाने भरलेली रक्कम संबंधित अधिकाऱ्यांनी प्रमाणित केलेली असावी.

अनुसूचित जमातींच्या भोगवटादारांच्या झाडांची विक्री करुन प्राप्त होणारी रक्कम उपरोक्त परि. १ मध्ये नमूद केलेल्या लेखाशीर्षामध्ये जमा करावी आणि उपरोक्त परि. २ मध्ये नमूद केलेल्या लेखाशीर्षाखाली मंजूर तरतूदीतून खातेदारांना नियमाप्रमाणे रक्कम अदा करावी, अशा प्रकारच्या सूचना सर्व संबंधीत कर्मचाऱ्यांना देण्यात याव्यात.

हे परिपत्रक वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. प्र.क्र. १६१/९२ व्यय-१० दि. ५.३.९२ अन्वये प्राप्त झालेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

[ गो. डो. तायडे ]
कार्यासन अधिकारी
महसूल व वन विभाग

प्रति :-

प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य नागपूर,

मुख्य वनसंरक्षक [ संधारण ], महाराष्ट्र राज्य नागपूर,